# गाडी तयार झाली... आता प्रवासघाई!

## मेट्रो-३वर डब्यांची जुळवणी पूर्ण; लवकरच चाचणी



म. टा. प्रतिनिधी, मुंबई

मेट्रो विस्ताराची प्रतीक्षा करणाऱ्या तमाम मुंबईकरांसाठी दिलासा देणारी बातमी आहे. मुंबई मेट्रोवरील महत्त्वाच्या आणि चर्चित कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गावरील मेट्रोच्या डब्यांची जुळवणी मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने पूर्ण केली आहे. मार्गावरील काही टप्प्यावर या गाडीची लवकरच चाचणी घेण्यात येणार आहे. डब्यांची जोडणी करण्यासाठी शंटरचा वापर करण्यात आला. या शंटरच्या मदतीने आठ डब्यांची मेट्रो सज्ज करण्यात आल्याची माहिती कॉर्पोरेशनने दिली.

### काय आहे शंटर?

- मेट्रो डब्यांच्या जोडणी करून गाडी बनवण्यासाठी, तसेच डब्यांच्या जागा बदलण्यासाठी वापर
- हे शंटर बॅटरीवर चालते
- एका चार्जमध्ये आठ डब्यांची गाडी नऊ किमीपर्यंत खेचणे, शक्य
- छोटेखानी असलेल्या टुमदार शंटरमध्ये ३५० टन वजन खेचण्याची क्षमता
- ५० किलो न्यूटन क्षमतेने काम
- मेक इन इंडिया उपक्रमांतर्गत शंटरची निर्मिती
- ठाण्यातील मे. रेनमॅक इंडिया आणि नेदरलँड्सच्या एनआयटीईक्यू संस्था यांच्या संयुक्त उपक्रमाने आणि तंत्रज्ञान हस्तांतरण करारान्वये शंटरची निर्मिती
- शंटरची स्वयंचलित कप्लरच्या मदतीने मेट्रो डबे जोडण्याची प्रक्रिया यशस्वी